।। सत्यमेव जयते ।।

# विदर्भ युवक विकास संस्था, बुलडाणा

द्वारा संचालित

विदर्भ युवक विकास संस्थेचे

## महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय
## बुलडाणा

# जागर

## वार्षिकांक २०२३-२०२४



राणी लक्ष्मीबाई



सावित्रीबाई फुले



जिजाऊ



अहिल्यादेवी होळकर

महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा

सत्यमेव जयते




संत गाडगे बाबा अमरावती
अध्यापक








## आमचे आधारस्तंभ



**स्व. बाळकृष्णजी वासनिक**

माजी अध्यक्ष, विदर्भ युवक विकास संस्था, बुलडाणा



**मा. खा. श्री. मुकुलजी वासनिक**

माजी केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री, भारत सरकार

महासचिव, अखिल भारतीय काँग्रेस समिती, नवी दिल्ली

## कुशल मार्गदर्शक



**प्रा. डॉ. संतोष विनायकराव आंबेकर**

अध्यक्ष, विदर्भ युवक विकास संस्था, बुलडाणा



**प्रा. सौ. मिनल संतोष आंबेकर**

सचिव, विदर्भ युवक विकास संस्था, बुलडाणा

विदर्भ युवक विकास संस्था, बुलडाणा

# महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा

# जागर

वार्षिकांक २०२३-२०२४

**संपादिका :**

प्रा. सुरेखा गोवर्धन इंगळे

प्र. प्राचार्या, महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा

**प्रकाशक :**

प्रा. सौ. मिनल सं. आंबेकर

सचिव, विदर्भ युवक विकास संस्था, बुलडाणा
सहा. प्राध्यापिका, महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा

**कार्यकारी संपादिका :**

प्रा. स्नेहलकुमारी ज्ञा. बोरकर

**संपादक मंडळ :**

प्रा. डॉ. राजेंद्र जा. हिवाळे
प्रा. गुलाबराव शा. सोनोने

**मुद्रक :**

श्री साई प्रिंटर्स
तार कॉलनी, सुंदरखेड

# विदर्भ युवक विकास संस्था, बुलडाणा

## - कार्यकारिणी -

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. संतोष विनायकराव आंबेकर | अध्यक्ष |
| २) | प्रा. श्री. नारायणराव शंकरराव गावंडे | उपाध्यक्ष |
| ३) | प्रा. सौ. मिनल संतोष आंबेकर | सचिव |
| ४) | डॉ. समिक्षा संतोष आंबेकर | सहसचिव |
| ५) | डॉ. शशिकांत नरसिंग खेडेकर | कोषाध्यक्ष |
| ६) | कु. सुरभि संतोष आंबेकर | सदस्या |
| ७) | श्री. सुनिल सखाराम नवघरे | सदस्य |
| ८) | श्री अंबादास येलोजी मोहिते | सदस्य |
| ९) | ॲड. श्री. दत्तात्रय संतोषराव चव्हाण | सदस्य |
| १०) | सौ. नवनिता दत्तात्रय चव्हाण | सदस्या |
| ११) | डॉ. संदीप राजेश्वर शेखर | सदस्य |



# संपादकीय....

विदर्भ युवक विकास संस्था, बुलडाणा द्वारा संचालित महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालयाचा साहित्याचा जागर हा वार्षिकांक सादर करताना खुप आनंद होत आहे.


क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, माँ जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई इ. महान व थोर स्त्रीयांचा प्रेरणेतुन व राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या आचार विचाराने चालणारे हे महाविद्यालय आहे. येथे प्रशिक्षणार्थी संपूर्णत: विकसित होण्यासाठी निरंतर प्रयत्न सुरू असतात.

आमच्या महाविद्यालयात प्रशिक्षण घेणाऱ्या प्रत्येकच शिक्षण प्रशिक्षणार्थींचे व्यक्तिमत्व अष्टपैलु घडावं हा प्रयत्न असतो. त्यासाठी शिक्षक प्रशिक्षणात आवश्यक असणारी समाजसेवा, कृतीसत्रे, स्नेहसंमेलन असतात पण विविध खेळ, ज्युडो कराटे, परिसंवाद, प्रश्नमंजुषा इ. उपक्रम वर्षभर असतात. तसेच त्यांयातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी व ते वृद्धींगत होण्यासाठी महाविद्यालय सतत प्रयत्नात असते. त्यामुळेच जागर या वार्षिकांकास जवळपास सर्वच शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांनी काव्य, लेख, चारोळ्या, चुटकुले, कलाकुसर देऊन त्यांच्यातील प्रतिभेचा अविष्कार करून दाखविला आहे.

जागर या वार्षिकांकाला नवा आयाम देणारे आमचे मार्गदर्शक व विदर्भ युवक विकास संस्थेचे अध्यक्ष प्रा. संतोष आंबेकर व संपादनाची प्रेरणा देणाऱ्या महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. मिनल संतोष आंबेकर यांच्यामुळेच जागरला पूर्णरूप आले.

यासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या सहकार करणारे महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद तसेच कार्यालयीन कर्मचारी व महाविद्यालयाच्या केंद्रस्थानी असणारे शिक्षक प्रशिक्षणार्थी यांची मी शतश: आभारी आहे.

**प्रा. डॉ. राजेंद्र जा. हिवाळे**
सहा. प्राध्यापक
महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा



# हितगुज...

संत गजानन महाराजांच्या पावन स्पर्शाने पुनित असलेला आपला बुलडाणा जिल्हा ! तसेच लोणार येथील उल्कापातामुळे निर्माण झालेल्या खाऱ्या पाण्याच्या सरोवरामुळे जागतिक स्तरावर असलेल्या बुलडाणा जिल्ह्याचे माँ जिजाऊंचे माहेरघर सिंदखेडराजा ही बुलडाणा ओळख आहे.

परंतु बुलडाणा जिल्हा हा सर्वच क्षेत्रात मागासलेला २५ वर्षांपुर्वी शैक्षणिक क्षेत्रातील मागासलेपण प्रकर्षाने जाणवत असल्यामुळे १९८४ साली विदर्भ युवक विकास संस्थेची स्थापना करण्यात आली. जिल्ह्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी शहरामध्ये उपलब्ध नसलेले अभ्यासक्रम सुरू करण्याचे कार्य संस्थेमार्फत करण्यात आले. त्याकरीता संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. बाळकृष्णजी वासनिक यांच्या आशिर्वादाने युवा व जाणते नेतृत्व, बुलडाणा जिल्ह्याच्या विकासाचे ध्येय असणारे तडफदार नेते मा. मुकुलजी वासनिक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वात प्रथम १९९४ मध्ये शारीरिक शिक्षण महाविद्यालयात सुरू करण्यात आले. नंतर १९९८ मध्ये मुकुल वासनिक विधी महाविद्यालय, २००१ मध्ये ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालय तर २००५ मध्ये महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय सुरू करण्यात आले.

जिल्ह्यातील युवकांचा सर्वांगीण विकास व्हावा, तसेच त्याचा सामाजिक, आर्थिक व नैतिक विकास व्हावा यादृष्टीने संस्था सतत प्रयत्नशील असते. बुलडाणा शहरानजीक ग्राम सुंदरखेड येथे सात एकराच्या परिसरात संस्थेची स्वत:ची मालकीची सुसज्ज इमारत आहे. भोवताली नैसर्गिक विस्तृत परिसर लाभलेला आहे. ज्ञानदानासाठी गुणवत्ता प्राप्त व तज्ञ अध्यापकांची नेमणुक केलेली आहे.

महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालयाच्या जागर वार्षिकांकास माझ्या मन:पुवर्ग शुभेच्छा!

**प्रा. संतोष आंबेकर**
अध्यक्ष, विदर्भ युवक विकास संस्था, बुलडाणा



# प्राचार्यांचे मनोगत...

विदर्भ युवक विकास संस्था, बुलडाणा द्वारा संचालित महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालयाचा जागर हा वार्षिकांक आपल्या हातात देताना मला अतिशय आनंद होत आहे.

प्रशिक्षणार्थी शिक्षक बंधु-भगिनींनी वर्षभरात केलेल्या कामाचा हा लेखा जोखा होय. बी.एड्. करतानाच्या आठवणी त्यांच्या सतत स्मरणात राहतील. या प्रशिक्षणात अभ्यासासोबतच अभ्यासपूरक उपक्रमाची रेलचेल असते. या उपक्रमाद्वारेच त्याच्यातील सुप्त गुणांना चालना मिळते. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलु दिसतात. स्वत:च्या क्षमतेचा पुरेपुर वापर करून त्यांच जीवन समृद्ध होण्यास मदत होते. त्याकरीता त्यांना मार्गदर्शन करण्याकरीता नामांकीत व्यक्तिच्या संपर्कात आणण्याचा आमचा सदैव प्रयत्न असतो. आमचे अध्यापक वृंदही त्यांच्या वैयक्तिक तसेच इतर समस्या दूर करून त्यांचे व्यक्तिमत्व घडविण्यास सहाय्य करतात. त्यांच्यामध्ये स्त्री-पुरूष समानतेचे बीज रूजविण्याकरीता आमचे जाणीवपूर्वक प्रयत्न असतात.

येथे आलेला प्रशिक्षणार्थी वेगवेगळ्या वातावरणातुन आलेला असतो. परंतु काही दिवसातच हे सर्व एकाच रंगात रंगलेल दिसतात. आमच्या महाविद्यालयातून बाहेर पडणारा शिक्षक हा उत्तम शिक्षकाबरोबरच उत्तम नागरीक घडावा, हीच त्यांच्याकडुन अपेक्षा.

आपल्या भावी आयुष्याकरीता अगणित शुभेच्छा !

**प्रा. सुरेखा गो. इंगळे**
**प्र. प्राचार्या**
**महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा**

# विदर्भ युवक विकास संस्था, बुलडाणा

र. नं. एफ /७९२/ बुलडाणा (म.रा.) द्वारा संचालित

**विदर्भ युवक विकास संस्थेचे**

## महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा

### ।। महाविद्यालयीन प्राध्यापक व कर्मचारी वृंद माहिती ।।

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा. कु. सुरेखा गो. इंगळे | प्र. प्राचार्या |
| १ | प्रा. सौ. मिनल सं. आंबेकर | सहा. प्राध्यापक |
| ३ | प्रा. डॉ. राजेंद्र जा. हिवाळे | सहा. प्राध्यापक |
| ४ | प्रा. स्नेहलकुमारी ज्ञा. बोरकर | सहा. प्राध्यापक |
| ५ | प्रा. सौ. उज्वला ग. चिम | सहा. प्राध्यापक |
| ६ | प्रा. श्री. विशाल अ. सावळे | सहा. प्राध्यापक |
| ७ | प्रा. गुलाबराव शा. सोनोने | सहा. प्राध्यापक |
| ८ | सौ. मोनिका प्र. नवघरे | वरिष्ठ लिपीक |
| ९ | सौ. रेणुका शि. टिकार | संगणक परिचालक |
| १० | श्री. सोमेश्वर वि. हाडे | शिपाई |

## अभ्यासपुरक कार्यक्रमाचा अहवाल : २०२३–२०२४

वर्षभरातील अभ्यासपूरक कायक्रमाद्वारे सर्व प्रशिक्षणार्थींना समान संधी मिळावी, या करीता सर्व प्रशिक्षणार्थींची चार गृहात विभागणी केली.

### – जिजामाता गृह –

गट प्रमुख : निकिता राठोड मार्गदर्शिका : प्रा. स्नेहलकुमारी बोरकर

**२ ऑगस्ट रक्षाबंधन :**

सत्र २०२३ २४ च्या सुरुवातीला रक्षाबंधन हा धार्मिक सण महाविद्यालयांमध्ये दिनांक २ ऑगस्ट २०२३ रोजी संपन्न झाला या सोहळ्यामध्ये छात्र अध्यापिका भगिनींनी छात्र अध्यापक बंधूंना राख्या बांधून त्यांच्या प्रती बंधुप्रेम व्यक्त केले याप्रसंगी प्राचार्य तसेच इतर प्राध्यापक गण उपस्थित होते.

**५ सप्टेंबर शिक्षक दिन :**

अध्यापक महाविद्यालयात अनन्य साधारण महत्त्व असलेला शिक्षक दिन ५ सप्टेंबर २०२२ रोजी प्राचार्य सौ. मिनल संतोष आंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी प्राचार्य प्रा. सुरेखा इंगळे यांच्या उपस्थितीत या गटाच्या मार्गदर्शिका प्रा. निकिता राठोड व त्यांचे सहकारी छात्रा–अध्यापक यांनी याप्रसंगी प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे आयोजन केले चार गटांमध्ये हा कार्यक्रम घेण्यात आला विजेत्या गटाला बक्षीस देण्यात आली.

**६ डिसेंबर २०२३ महापरिनिर्वाण दिन :**

सहा डिसेंबर २०२३ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली याप्रसंगी विदर्भ युवक विकास संस्थेचे सचिव प्रा. संतोष आंबेकर यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केले व त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला याप्रसंगी राजेंद्र म्हात्रे, पूजा पाटील यांनी आपले विचार मांडले याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य अध्यापक बंधु यांची उपस्थिती होती

**युवा सप्ताह दिनांक ०३ जानेवारी ते १२ जानेवारी २०२४ :**

दरवर्षीप्रमाणे यंदाही संस्थेच्या वतीने राष्ट्रीय युवा सप्ताहाचे आयोजन दि. ०३ जानेवारी ते १२ जानेवारी २०२४ दरम्यान साजरा करण्यात आला दिनांक ०३ जानेवारी पासून विविध दिन साजरे करण्यात आले दि. ०३ जानेवारी सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ॲड. डी. एस. चव्हाण प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य सौ मीनल आंबेकर कार्य प्राचार्य प्रा. सुरेखा इंगळे प्रा. नवनीता चव्हाण, संतोष वानखेडे व इतर प्राध्यापक बंधू उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी कल्पना गाडेकर यांनी तर आभार प्रदर्शन निखिल उबाळे यांनी मांडले

**दि. ३ जानेवारी २०२४ सावित्रीबाई फुले जयंती :** बी.एड्.प्रथम वर्ष व द्वितीय वर्षाच्या सर्व छात्र अध्यापकांनी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी करून युवा सप्ताहाचा उद्‌घाटन समारंभ संपन्न झाला.

**दि. ४ जानेवारी २०२४ स्वच्छता अभियान :** महाविद्यालयातील सर्व छात्र अध्यापकांनी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ केला.

**दि. ५ जानेवारी २०२४ मिलेट डिश स्पर्धा :** यादिवशी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध डिश तयार करून मिलेट डिश स्पर्धेत सहभाग घेतला होता.

**दि. ६ जानेवारी २०२४ फॅन्सी ड्रेस स्पर्धा :**

या स्पर्धेत बी.एड्. छात्र अध्यापकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन विविध प्रांतातील वेशभुषा सादर करून दाखविल्या.

**दि. ८ जानेवारी २०२४ पोस्टर्स स्पर्धा :**

या दिवशी महाविद्यालयात Gender Issue शी संबंधीत पोस्टर्स स्पर्धा ही घेण्यात आली. सदर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी स्त्रीयांवर होणारे अत्याचार यासंबंधी विविध भित्तीपत्रके तयार केली होती. तसेच त्याचे सादरीकरण सुद्धा केले.

**दि. ९ जानेवारी २०२४ वक्तृत्व स्पर्धा :**

यादिवशी महाविद्यालयात शेतकरी आत्महत्या व लोकशाही समोरील आव्हाने या विषयावर वक्तृत्व स्पर्धा ही घेण्यात आली.

**दि. १० जानेवारी २०२४ संगीत खुर्ची व हॉलीबॉल स्पर्धा :**

**दि. ११ जानेवारी २०२४ क्रिकेट स्पर्धा :**

या दिवशी विधी महाविद्यालय विरूद्ध महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय क्रिकेट सामना अटी-तटी मध्ये संपन्न झाला. यामध्ये विधी महाविद्यालयाने विजय संपादन केला.

**दि. १२ जानेवारी २०२४ वक्तृत्व स्पर्धा :**

यादिवशी सकाळी ९ वा. आरोग्य तपासणी व ११ वाजता बक्षीस वितरण व समारोपीय कार्यक्रम संपन्न झाला.

## – राणी लक्ष्मीबाई गृह –

गट प्रमुख : आशा शर्मा मार्गदर्शिका : प्रा. स्नेहलकुमारी बोरकर

**दि. १४ सप्टेंबर हिंदी दिन :**

दि. १४ सप्टेंबर २०२३ हिंदी दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये हिंदी देशभक्ती पर गीतगायनाची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सर्वप्रथम महाविद्यालयाच्या प्राचार्य सौ. मिनल आंबेकर काय. प्राचार्य सुरेखा इंगळे यांनी भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन केले. विजयी स्पर्धकांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आकाश खरात व आभारप्रदर्शन आशा शर्मा यांनी केले.

**दि. २ ऑक्टोबर महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री जयंती :**

महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सचिव प्रा. संताष आंबेकर, पोलीस प्रशिक्षणार्थी व छात्र अध्यापकांनी रक्तदान केल. या कार्यक्रमास सामान्य रूग्णालयाच्या चमुचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्र संचलन आकाश खरात यांनी तर आभारप्रदर्शन मनिषा सुसर यांनी मानले.

**दि. ३१ ऑक्टोबर :**

दि. ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी इंदिरा गांधी पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद व छात्र प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. सूत्रसंचलन निखील उबाळे तर आभारप्रदर्शन प्राची काकडे यांनी केले.

**दि. २७ डिसेंबर २०२३ डॉ. पंजाबराव देशमुख जयंती :**

डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्तअ बचतगटातील महिलांचा मेळावा संपन्न झाला. भाऊसाहेबांनी बहुजन समाजासाठी संपूर्ण विदर्भात शिक्षणाचे जाळे पसरविले. महात्मा फुले सावित्रीबाई फुलेंचे कार्य घराघरात पोहोचविले. यानिमित्त सुशिक्षीत व अशिक्षित कुटूंबातील फरक दाखविणारी नाटिका छात्र अध्यापिकांनी सादर केली. ग्रामीण भागातील बचत गटातील महिलांनी याप्रसंगी शिक्षणाची आस्था दाखविणारी मते प्रकट केली. याप्रसंगी महाविद्यालयीन प्राचार्य व प्राध्यापक वृंदाची छात्र अध्यापकांची उपस्थिती लाभली.

## – अहिल्यादेवी होळकर गृह –

गट प्रमुख : निरज उबाळे मार्गदर्शक : प्रा. डॉ. राजेंद्र हिवाळे

**दि. ८ सप्टेंबर २०२३ जागतिक साक्षरता दिन :**

जागतिक साक्षरता दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रत्येकाने कमीत कमी ५ व्यक्तिंना साक्षर करावे असा मानस व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सौ. मिनल आंबेकर व इतर प्राध्यापक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश इंगळे तर आभार प्रदर्शन मनिषा मुळे हिने मानले.

**दि. २६ नोव्हेंबर २०२३ :**

संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी संविधान दिनाचे महत्व प्राचार्य व प्राध्यापक वृंदांनी तसेच छात्र अध्यापकांनी कथन केले. सूत्रसंचालन कल्पना गाडेकर तर आभार प्रदर्शन मोहन सुरडकर हिने केले.

## – सावित्रीबाई फुले गृह –

गट प्रमुख : मयुरी जगताप मार्गदर्शिका : प्रा. गुलाबराव शा. सोनोने

**दि. ३० नोव्हेंबर २०२३ :**

संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. संतोषजी आंबेकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यावेळी रांगोळी स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, बायकोला पगार द्यावा का? यावर परिसंवाद, पुष्परचना स्पर्धा व क्रिकेटच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

रांगोळी स्पर्धेत पुजा सास्ते, परिसंवाद मध्ये तेजस्विनी पाटील, सामान्य ज्ञान स्पर्धेत संगिता पवार, पुष्परचनेत पुर्वा देशमुख, क्रिकेटमध्ये बी.एड. प्रथम वर्षाच्या प्रशिक्षणार्थींनी द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थींवर मात करून विजय मिळविला. विजयी स्पर्धकांना सत्कारमुर्ती प्रा. आंबेकर यांच्या हस्ते बक्षिस वितरण झाले. याप्रसंगी प्राचार्य सौ. आंबेकर सर्व अध्यापक व बी.एड्. प्रशिक्षणार्थींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्र संचलन आशा शर्मा व आभार प्रदर्शन किरण ठाकुर हिने केले.

**दि. २० डिसेंबर २०२२ श्रमदान शिबीर व चालता बोलता कार्यक्रम:**

दि. २० डिसेंबर २०२२ रोजी संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालयाच्या परिसरामध्ये श्रमदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. यावेळी सर्व छात्र अध्यापकांनी श्रमदान केले. श्रमदान करताना सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नांचा चालता-बोलता कार्यक्रम प्रा. डॉ. राजेंद्र हिवाळे यांनी सादर केला. यामध्ये लागोपाठ तीन प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्यांना रोख बक्षिसे देण्यात आली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कल्पना गाडेकर तर आभार प्रदर्शन संगिता इंगळे यांनी केले.

## समता

कुळाचा तो दिवा । मानती मुलाला
हक्क जास्त त्यालया । कुटूंबात
वंशाची ती वेल । कन्या ही वाढवी
न्यायाने गणावी । मुलासम
दाम्पत्याचा प्राण । वेल अन दिवा
समान असावा । हक्क दोघा
भ्रुण हत्या असे । कन्या अपमान
अंकुर महान होती जाण
वाचवी कन्येस । दाखवी विश्व ती
सारे जन्म घेती । स्त्रीच्या पोटी
मुलगा व कन्या । पूजा माता-पिता
संतुलन आता । जना हाती
महिला पुरूष । सृष्टीची निर्मिती
तिला साथ देती । भाग्यवान

**– रूपाली वसंतराव विसपुते**
बी.एड. द्वितीय वर्ष

## संधी द्या

स्त्रीच्या पोटी जन्म घेती
अन् कन्या भ्रुणास नाकारती
म्हणती अंकुराचा बनतो वृक्ष
कां बनवती कन्या भ्रुणाला भक्ष्य?

उजेडासाठी पेटवती ज्योती
सृष्टीत येणारी कन्या नाकारती
अंगणात जगवती तुळशी
कन्या भ्रूणाला कां जमिनीत पुरशी?

मुलगा वंशाचा दिवा मानती
ज्योती विना प्रकाश मिळल कां जगती?
बेटी-धनाची पेटी गणती
कोंबडी मारून कां अंडी मिळती?

सून शोधण्या गावोगाव भटकती
अन् दुर्दैव कन्या भ्रूण नाकारती
भ्रूण असते अजान नका मुरगळु मान
वाढविल तुमची शान, कां ग न ठेवती भान?

भ्रूणाचे बनून आई बाप
हत्यारे बनून करू नका पाप
कीर्ती दिगंतरी नेण्यास
कां न देती संधी कन्या भ्रुणास?

**– रूपाली वसंतराव विसपुते**
बी.एड. द्वितीय वर्ष




REDMI NOTE 9 PRO
48MP QUAD CAMERA

REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA


REDMI NOTE 9 PRO
48MP QUAD CAMERA




संविधान दिवस







REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA









## समारोप – एक सोहळा

सुखाच्या सोहळ्यास आनंद-अश्रूंनी
नवे ऋणानुबंधते पाहले...!
अवघड त्या अप्रीत क्षणा तुला भाव
ते नं जाहले...!!

महाविद्यालयीन जगतात...
मॅम वेळप्रसंगी मायेची सावली झालात
कधी कणखर शब्दांतुनी मोठी ताई,
कधी मैत्रीची नवी परिभाषा, तुम्ही
आम्हास जाहल्या...!
नावाची समर्पकता जिंकलात तुम्ही
स्नेहबंधातूनी जपले प्रत्येक
छात्रअध्यापक/अध्यापिकांचे मन,
गुरू-शिष्य परंपरेचे नवबंध मी पाहले...!!

द्विवर्षीय या प्रवासाचे कल्प,
जूण कपिलाषष्टीचा योग म्हणोनि
मी पून्हा नव्याने पाहले...!
अशा या सोहळ्यास चंद्र-तारकांचे
आयोजन सवें सख्या-सवंगड्यांचे
सान्निध्य, शब्दा तुला भाव ते नं
जाहले...!!

अव्यक्ततेतुन-व्यक्ततेच्या वाटेला
भावनिकतेतुन उधान जाहले..!
नाते या भावनिक बंधाच्या आठवांचे
प्राक्तनबंधात जणू इंद्रधुन स्वरूप
सप्तरंगात जडताना, मी पाहले...!!

**– राहुल सुभाष लहाने**
बी.एड. द्वितीय वर्ष

## ओढ भेटीची

आई का ग मला तुझ्यापासुन
रहावं लागतं दुर
नेहमी माण्या मनाला लागलेली
असते हुरहुर

डोळ्यांत अश्रु आहे
ओठांवर तुझे नाव आहे
मनात हुंदका कोंडला आहे
तुझ्या भेटीची खुप लागली
आहे आस
आई कधी ग नेशील तु
मला तुझ्या पास
जेव्हा टोचून बोलतात सारे
शब्द त्यांचे मनात
घर करून बसले
पण आई तुला कधीच मी काहीच
सांगणार नाही सांगुन तुला
मी परेशान करणार नाही
प्लीज आई चल ना ग मला
घेऊआपल्या घरी...

**– मनिषा सुनिल सुसर**
बी.एड. द्वितीय वर्ष

## शिक्षक

शिक्षक म्हणजे विशाल वृक्षच असतो ज्याच्या फांदी फांदीतून सळसळत असतात बेदरकारपणे ज्ञानाची पानं, त्याच्याच छायेखाली सौख्य लाभते अज्ञानाच्या उन्हात न्हाऊन निघालेल्या अस्फुट चित्रकाराला किंवा त्याच्याच रेषेखाली अधांतरी लटकलेली असतात कित्येक भावनांच्या डोहात भिजून नतमस्तक झालेली इवलाल्या चेहऱ्याी निरागस अक्षरे. शिक्षक नसतो कधीच बिचारा तोच तर असतो सर्वस्वी बादशहा शाळेचा त्याच्याच स्वामीत्वाने महत्त्व येत असते शाळेला तोच तर असतो खरा संशोधक, शास्त्रज्ञ अंधार भरलेल्या चिमुकल्या गोळ्यातून सूर्याचं तेज बाहेर काढणारा तो समाज सुधारक क्रांतीकारकही तोच कित्येक चेतनांना पाठबळ असते त्याच्या समर्थ तत्त्वज्ञानाचे शिक्षकाला जपावी लागतात कुतूहलाच्या झाडाची पानं जीवापाड आणि आकार द्यावा लागतो एका मुक्तपणे बागडणाऱ्या निराकार चैतन्याला... कधी स्वत:ला विसरून बागडावं ही लागतं जाणून घ्यावी लागतात बोल खोल खोल काळजाच्या आत निर्ममपणे... कधी अंधारही प्यावा लागतो बेभानपणे तेव्हा कुठे चमकतात उजेडाची किरणं उद्दिष्टांच्या वाटेवर त्याच्या सोबतीला असतेच की खडूची धारदार तलवार अन् फळ्याची ढाल असते पाठीशी
विश्वास ठेवा एक ना एक दिवस अंधार संपून उजेडाचे राज्य येईल.
अन तेव्हा मात्र शिक्षक म्हणून त्याची प्रतिमा अधिक स्पष्ट दिसेल.

**– निखिल सुरेंद्र उबाळे**
बी.एड. द्वितीय वर्ष

## बुद्ध

चल विचारांचे आपण खेळू युद्ध
तू आणि मी दोघे ही होवून बुद्ध
पैज असेल शस्त्राला जाळण्याची
प्राणी मात्रांवर नेहमी दया करण्याची

ढाल सत्याची घेऊन चल मग लढूया
प्रेम, करूणेने हे मग जग जिंकुया
क्रोध, घृणा, हिंसा, पाप, द्वेष, मारण्या
शांती मधून ही मग क्रांती घडवण्या

वर्तमानात जगू सुखी समाधानी राहू
जीभेवर अन मनांवर विजय मिळवू
जिंकलाच जर तूं हे विचारांचे युद्ध
भेटेल तुला मानवतेचा मग माझा बुद्ध

**– कु. शुभांगी गौतम गुडदे**
बी.एड. द्वितीय वर्ष

## स्वर्णीय धारणा

जीवन की पहल, शिक्षा से चहल ।
गुरूओं का आशिर्वाद, मित्रो से परिवार ।

जीवन की शैली से हुआ साक्षातकार ।।

गुरूओ का मार्गदर्शन, बना सफलता का आकर्षण ।
परिश्रम की अनुभूति, मित्रो की सहानुभूति

जीवन मे बने सभी यादों की आकृति ।।

शिक्षा से बने शिक्षक, विद्या से हो विद्यालय,
महात्मा गांधी महाविद्यालय...

स्वर्ण शिक्षकालय, स्वर्ण शिक्षणालय ।।

**– आशा सीताराम शर्मा**
बी.एड. द्वितीय वर्ष

Those were the best days of my life,
When fun and frolic was rife.
A refreshing realm of knowledge,
That was my college.

Funny friends and loving lecturers,
Freaky fundas and flexible study hours.
Riddles and rumors, gossips and giggles-umpteen,

And the subject suited my sensitive nature.
I was initiated into the world of stories, poems and plays,
Each lecture set my imagination ablaze.

My college was a literary paradise,
Where I learnt to critically analyze,
Every text that came my way,

Free from the fetters of school,
I willingly jumped into the knowledge pool.
Where education was mixed with entertainment,
At college learning was never a punishment.

**-Shaikh Shujaat Aadil**
B.Ed. 2nd Year

## शिक्षक

त्याच्या ज्ञानाच्या प्रकाशाने
प्रत्येक घरात ज्ञानाचा दिवा लावणे
जो मुलांना शिकवतो
त्यांना राष्ट्रनिर्माते म्हणतात !

ज्ञानाचा प्रकाश देण्या
दिवा अखंड तू जळतो
जीवनाचा अर्थ खरा
गुरूमुळेच कळतो

आयुष्याच्या कोऱ्या कागदी
सजते सुरेख नक्षी
गुरूच्या ठाई घडती शिष्य
अतिहास आहे साक्षी

दिले सदा ओंजळ भरूनी
कमी कुठे ना राहिली
गुरूंचा सहवास म्हणजे
ग्रीष्मात ही सावली

ऋण असे हे न फिटणारे
आहे गुरूंचे माझ्यावरी
होता येणार नाही उतराई
कोणतीही गुरूदक्षिणा दिलीतरी... !

**– कु. शुभांगी गौतम गुडदे**
बी.एड. द्वितीय वर्ष

# !! राजमाता आईसाहेब जिजाऊ !!

विदर्भातील मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथे राजे लखुजी जाधव आणि म्हाळसाबाई यांचे पोटी एक दिव्य तेजोमय कन्यारत्न १२ जानेवारी १५९८ ला जन्माला आले. त्या म्हणजे माँ साहेब जिजाऊ जाधव परिवारात चार मुलांनंतर मुलगी जन्माला आली म्हणून सर्वांना अतिशय आनंद झाला. आणि माँ जिजाऊंच्या जन्मोत्सवाला पाहता-पाहता दिवाळीचे रूप आले. नगरास साखरपान व भोजन दिले गेले. आनंदमय वातावरणात चिंब होत असताना माँ साहेबांचे काका जगदवेराव हे परिवारासहीत तुळजापूरला देवीची ओटी भरण्यासाठी गेले.

अतिशय लाडाकौतुकात माँसाहेबांचे बालपण गेले परंतु बाहूला बाहूलींचा खेळ खेळण्यात त्यांनी बालपण गमावले नाही, तर काकांच्या आणि मोठ्या भावाच्या मदतीने अनेक मैदानी खेळात त्या तरबेज झाल्या बालवयातच इ.स. १६१० दरम्यान त्यांचा देवगिरी येथे शहाजीराजे यांच्याशी अतिशय थाटामाटात विवाह पार पडला. पुढे इ.स. १६१९ ला पहिले पुत्र जन्माला आले. ते म्हणजे संभाजी राजे (इ.स. १६५४ मध्ये वयाच्या ३५ व्या वर्षी कणकगिरीच्या युद्धात मारले गेले) आणि मोघलांच्या अत्याचाराविरूद्ध आई बहिणीच्या रक्षणा करता माँ साहेबांनी आईसाहेब तुळजाभवानी मातेचा पुत्र मागितला जो या नरसंहार करणाऱ्या जुलमी शासन राजवटीला झुगारून इथे कष्ट करी शेतकरी मायबाप जनतेचे रक्षण करू शकेल व स्वराज्य निर्माण करू शकेल. इ.स. १६३० ला अशा रयतेच्या राजाचा जन्म झाला. (ता. जुन्नर शिवनेरी) शिवाजी महाराजांची जबाबदारी मोठ्या खंबीरपणे माँ साहेबांनी पेलली.

त्यावेळी आदिलशाही, निजामशाही, मोगलशाही यांसारख्या बलाढ्य सम्राज्याखाली संपूर्ण देश दडपला गेला होता. जिकडे तिकडे अन्याय अत्याचार माजला होता. शेतकरी, व्यापारींना रयतेला कोणी वाली उरला नव्हता स्यत अगदी गंजुन गेली होती.

नेमकी हीच परिस्थिती बदलविण्यासाठी, रयतेला संकटातून बाहेर काढण्यासाठी शहाजीराजे सांगतील ती गोष्ट मानुन शिवाजी महाराजांना रामायण, महाभारत यासारख्या गोष्टी सांगत त्यांना घडविण्याचे महान कार्यकेले, त्यांच्या योग्य संस्कार केले त्यांना केवळ महाभारताच्या रामायणाच्या कथा सांगितल्या नाहीत तर गोरगरीब जनतेसाठी शेतकरी कष्टकरी त्यांच्या हक्कासाठी लढण्यास भाग पाडले. गुरूंच्या मदतीने शिवरायांना मैदानी खेळाचे धडे दिले आणि पुढे माँसाहेबांच्या अथक प्रयत्नाने शिवरायांच्या नसानसात मनामनात स्वराज्याची ज्योत पेटवली, राजे कधीही माँ साहेबांचा आशीर्वाद घेतल्याशिवाय बाहेर जात नसत.शिवाजी महाराजांना सर्वात जास्त सहवास लाभला तो माँसाहेबांचा. त्यामुळे महिलांप्रती त्यांच्या मनात कमालीचा आदर होता. आत्मविश्वास आणि समाजनिष्ठा ही मुल्ये शिवाजी महाराजांच्या मनात निर्माण केली. त्या हयातभर अनेक दु:खांचा, संकटाचा सामना करीत राहील्या पण खचल्या नाहीत. डगमगल्या नाहीत.

उलट शत्रुसंगे लढण्यासाठी वेळोवेळी शिवाजी महाराजांना प्रोत्साहन दिले. राष्ट्रभक्तीची बीजे त्यांच्यात रूजवली. माँसाहेब धार्मिक होत्या त्यांचा संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर दृढ विश्वास होता. शिवाजी महाराजांनाही त्या अभंग ऐकवत. आपल्या संस्काराने आणि कर्तबगारीने शिवरायांना घडविले, जर जिजाऊ जन्माला आल्या नसल्या तर शिवराय घडले नसते. आणि मग ना मराठा, ना महाराष्ट्र ना ताठ कणा जगण्याची पशुपेक्षाही होन अवस्था या देशातील रयतेची झाली असती.

म्हणूनच म्हणावेसे वाटते...

जिजाऊ तुम्ही नसता तर,
नसते झाले शिवराय नी शंभू छावा...!
जिजाऊ तुम्ही नसता तर,
नसता मिळाला स्वराज्य ठेवा...!

जिजाऊ तुम्ही नसता तर,
नसते लढले मावळे...!
जिजाऊ तुम्ही नसता तर,
नसते दिसले विजयाचे सोहळे...!

**– अक्षय गजानन बाठे**
बी.एड. द्वितीय वर्ष

## मनुष्य

माणसे आजकाल कशी बदललेली दिसतात !
ना कोणाचे प्रेमळ शब्द ना ज्ञान !
ना कोणाचे कौतुक ना गुणगान !
मनुष्य आपल्याच धुंदी जगत चाललाय !
ना भविष्याची चिंता ना लोकांचा विचार !
गल्लीच्या माणसामध्ये प्रामाणिकपणा राहिलाच कुठं !
आपलाच स्वार्थ जपला पाहिजे एवढेच मात्र खरं !
मनुष्य विश्वभान हरवत चाललाल पण जाता जाता माणुसकीची परिभाषा विसरता चाललाय !
मनुष्य खुप मोठी स्वप्ने बघण्यात व्यस्त आहे !
पण आजू बाजूच्या लोकांचा विचार करणं विसरत चाललाय.
स्वत:चे नैराश्य सांगवत नाही आणि कोणाशी बोलायची याची हिम्मत नाही !
या सर्व गोष्टीचा गुंताच झालाय पण शेवटी आत्मदहनाशिवाय पर्यायच उरला नाही !

**– दिपक भागवत पाटील**
बी.एड. द्वितीय वर्ष

## मला पुन्हा एकदा तरी शाळेत जायचं...

मला पुन्हा एकदा तरी शाळेत जायचं...
धावत जाऊन पुन्हा माझ्या रोजच्या
बाकावर बसायचं...
रोज सकाळी मोठ्या आवाजात
राष्ट्रगीत म्हणायचं...
नव्या वहीचा वास घेत पहिल्या पानावर
स्वच्छ अक्षरात आपलं नाव लिहायचं...
मला पुन्हा एकदा तरी शाळेत जायचं...
मधली सुट्टी होताच वाटरबॅग सोडुन
नळाखाली हात धरूनच पाणी प्यायचं...
कसा बसा डबा संपवत चिंचा-बोरं खायचं
सायकलच्या चाकाला स्टंप बनवून
खोडबर पाटीने क्रिकेट खेळायचं...
उद्या पाऊस पडुन शाळेला सुट्टी मिळेल का?
हा विचार करत झोपी जायचं...
घंटा व्हायची वाट बघत का बसेना
परंतु मित्र-मैत्रिणी सोबत सायकलची
रेस लावुन घरी पोहचायचं...
ती पळत जाण्याची मजा अनुभवायला
मला पुन्हा एकदा शाळेत जायचं...
मला पुन्हा एकदा शाळेत जायचंय...

**- अक्षय गजानन बाठे**
बी.एड. द्वितीय वर्ष

## आयुष्य

हे आयुष्या...
निराशेचा गुंता पदोपदी पेरलास तू
सावरलास - सावरत नाही अगदी
आयुष्याच्या दु:खमय वळणावर सुख कधी देशील तू
डोळ्यांनी सुखाचा मैलाचा दगड कधी पाहिलाच नाही.

जीवन खूप सुंदर आहे, हे बोल जसे
पण, आयुष्यात आनंद कधी देशील तू
शोधतो आहे आनंद क्षणा-क्षणात
परी, आयुष्याच्या गुंत्यातून जणू सुटतच नाही मी

आयुष्यात माणसं मात्र बरीच दिलीस तू
प्रेमळ, रागीट, फटकळ मात्र उदास का असे मी,
मज कळेना, ह्या जीवनप्रवासात एकटाच का असे मी
या जिंदगाणीत माणुसकी जरी पेरली मी

कोण जाणे, उद्या असेल की नसेल मी
आपल्या माणसांच्या मनामनात स्मरेल मी
यथोचित आनंद मिळू दे तुंबळ
तुज माहितसे आहे मी सळसळता पिंपळ
हे आयुष्या...

**- आकाश शेषराव खरात**
बी.एड. द्वितीय वर्ष

## महाविद्यालय...

महाविद्यालय आमचं छान आहे
मातृतीर्थ बुलढाणा गावाची शान आहे
विद्यालय आमचं महान
तिथे मिळतो सर्वांना मान
विद्यालय आमचं आहे नदी आणि घाट तिरावर
परंतु राज्य करते प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनावर
विद्यालय आमचे शिस्तीचे नेक
कारण त्याचे प्राचार्य डॉ. आंबेकर सरांची देखरेख
विद्यालय आहे प्रा. डॉ. हिवाळे सरांच्या नियंत्रणात
शिक्षण कार्याला समाजाची उत्तम साथ
विद्यालयाचं क्रिडांगण दिसायला लहान
परंतु येथून खेळाडू बनले महान
विद्यालय म्हणजे ज्ञानाचा साठा
म्णहूनच इथे नाही बुद्धीनिष्ठ प्राध्यापकांचा तोटा
विद्यालय आमचं अध्यापनात महान-
म्हणूनच इथे येण्याची विद्यार्थ्यांना लागते तहान...

**- अक्षय गजानन बाठे**
बी.एड. द्वितीय वर्ष

## मैत्री

मैत्री, अशा असावी जशी वणव्यामध्ये गारवा
देणारी...
मैत्री असावी कृष्णा आणि सुदामा सारखी,
डोळ्यातील भावना न बोलता समजून घेणारी
मैत्री असावी सुई धाग्याच्या जोडीसारखी
एकमेकांच्या अस्तित्वाची ओळख देणारी
मैत्री अशा असावी भरकटलेल्या पाखराला घराची
वाट दाखवणारी...
बागेतील सुकलेल्या फुलांना बहर आणणारी...
दु:खाच्या क्षणात मायेचा पाझर फुटणारी
एकटेपणाच्या वेळेत सहवासाचा दिलासा देणारी
न सांगता सर्व काही समजून घेणारी,
न बोलताच डोळ्यातील भाव ओळखणारी...
अशी असावी मैत्री जशी हृदयाशी स्पंदनाची...

**- मनिषा वसंता मुळे**
बी.एड. द्वितीय वर्ष

# विठ्ठल उभा

विठ्ठल उभा,
जसा अष्टगंध टिळा ।
वारकरी उभा,
चंद्रभागा तीरा ।

गात अभंग विराणी,
जसा राग किरवानी ।
तुळस डोलीची दिसे,
जसे वाहे इंद्रायणी ।

ज्ञानदेवे रचीले,
अभंग सारे ।
जसे तुकारामाचे,
शब्द निराळे ।

पुंडलिक भक्त,
भज़वे निराळा ।
झाला धन्य,
पाहुनी सोहळा ।

शाममेघ घन,
तो पवित्र गाभारा ।
वाहे ताल,
मृदंग वारा ।

आषाढी तिथी,
बरसती धारा ।
हे ! गा विठ्ठला,
तुची सहारा।।

ये बरसूनी मेघ
वाट पाहे चकोर,
संसार झाला पावन,
तूची कृपा अवतार ।

धन्य होई,
जीवन सारे,
उभा भगवंत,
पंढरपुर ।

दे ! गा बा विठ्ठला ।
आता दर्शन दयेचे,
आम्ही भक्त सारे,
तुझीया कृपेचे... ।

**– आरती जोशी**
बी.एड. प्रथम वर्ष

## काहीतरी करायचंय मला...

काहीतरी करायचंय मला...
साधलेल लक्ष्य गाठायंच मला
येतील अडचणी खुप साऱ्या
त्यांना पार करून जायचंय मला
काहीतरी करायचंय मला...
रोज-रोजच्या टोमण्यांना
पूर्णविराम लावायचाय मला
मनात उसळलेल्या वादळाला
पार शांत कराचंय मला
काहीतरी करायचंय मला...
उजळेल दिवस माझा ही
फक्त लढत राहायचंय मला
सारे लळतील माझ्या किर्तीवर
आभाळाला ठेंगणं करायचंय मला
काहीतरी करायचंय मला...
आता जे सावरलेय
मागे बघायचं नाही मला
संघर्षातून यशाच्या शिखराकडे
वाटचाल करायची आहे मला
काहीतरी करायचंय मला...

**- मनिषा वसंता मुळे**
बी.एड. द्वितीय वर्ष

## तू समोर येता...

तू समोर येता, स्पर्श असा होतो जीवा...
हृदय धावते वेगे, श्वास गंधाळतो जरा..।

तू समोर येता, नजर अशी खिळते...
हरवलेल्या मला, मी च मग सापडतो..।

तू समोर येता, नशा अशी चढते...
रातराणी ती, दिवसा फुलली वाटते..।

तू समोर येता, स्तब्ध होते धरा...
शांत होतो वारा, अन् तो सागर किनारा..।

तुझे समोर नसणे, गौण नाही मुळी...
कस्तुरीचे मोल मृगा, कळते का ग कधी...?

**- निलेश सुरेश इंगळे**
बी.एड. द्वितीय वर्ष

## आयुष्याच्या वाटेवर

जर तुझ्याकडुन दुसऱ्याचे चांगलेग
होत नसेल तरी चालेल
पण कुणाचाही वाईट करण्याचा
विचारही करू नकोस आयुष्याच्या वाटेवर

जर तुला मुक्या प्राण्यांवर
दया करता आली नाही तरी चालेल
पण त्याच्यावर वार करण्याचा विचारही
करू नकोस आयुष्याच्या वाटेवर

आंधळ्या पांगळ्याना तू कधी
सहारा दिला नसेल तरी चालेल
पण त्यांचा सहारा हिरावून घेण्याचे
धाडसही करू नकोस आयुष्याच्या वाटेवर

जीवन जगत असताना कुणाला
हसवता नाही आले तरी चालेल
पण कुणाला रडवण्याचा विचारही
करू नकोस आयुष्याच्या वाटेवर

आयुष्यभर एक झाड जरी
लावले तरी चालेल परंतु
हिरव्या झाडावर कुऱ्हाड तरी
चालवू नकोस आयुष्याच्या वाटेवर

**– राहुल राजेंद्र तांदुळे**
बी.एड. द्वितीय वर्ष

## माणुसकी हरवत आहे...

प्रगती बघून दुसऱ्यांची मन
आज जळत आहे
त्यांनी कष्टाने केली प्रगती
तरी त्यांचा द्वेष करीत आहे
द्वेषापोटी माणसातील माणुसकी
ही हरवत आहे.

मायेचा हात सुटत आहे
दया भाव तुटत आहे
लालसेला बळी पडून आपलेच
आपल्याला लुटत आहे
कारण माणुसकी ही हरवत आहे

जग हे प्रगती करत आहे
संस्काराची कमी होत आहे
एकोपा हा खंडत आहे
जीवन-जीव जात आहे
कारण माणुसकी ही हरवत आहे

यंत्रणा आधुनिक असली तरी
संस्कार हे जुनेच ठेवा
मनात द्वेषाऐवजी प्रेमाचा भाव पाहिजे
प्रत्येकाच्या मनात दानव नसून मानव पाहिजे
माणुसकी जपल्याने मनाला शांती लाभेल
आनंदी वातावरण चोहिकडे असेल
वरिष्ठांची हीच शिकवण आहे
पण आपण ते विसरत आहे म्हणून
माणुसकी ही हरवत आहे.

**– राहुल राजेंद्र तांदुळे**
बी.एड. द्वितीय वर्ष

## अशी ही आमची मैत्री

कधी वाटते कारल्यासारखी कडू
तर
कधी वाटते साखरेसारखी गोड
अशी आहे आमची मैत्री

कधी मिर्चीसारखी तिखट
तर कधी मिठासारखी खारट
अशी आहे आमची मैत्री

कधी वाटते समुद्रांच्या लाटांएवढी तर
कधी वाटते फक्त थेंबाचा ओलावा
अशी आहे आमची मैत्री

कधी वाटते कळीसारखी तर
कधी वाटते त्या सुकलेल्या फुलासारखी
अशी आहे आमची मैत्री

कधी वाटते Tension दुकान तर
कधी वाटते Happiness चा बाजार
अशी आहे आमची मैत्री

कधी वाटते उन्हात सावली
देऊन जाणारी आहे आमची मैत्री

तर कधी वाटते हसता हसता
एक दिवस रडवून जाईल
आमची मैत्री
अशी आहे आमची मैत्री

**– राहुल राजेंद्र तांदुळे**
बी.एड. द्वितीय वर्ष

## ताई

चोरून-चोरून रडण आता
सोड न गं माझी ताई

तुझ्या लग्नाच्या दिवसासाठी
केली होती सगळ्यांनीच किती घाई?

तुझं असं घाबरणं पाहुन
किती रडतील गं बाबा अन् आई

लाडाची माझी ताई इतकी कमजोर नाही
अंधारलेल्या आमच्या जीवनात तु सदा
उजेड देत राही

कधी तू उपाशी पण
नाही केली तक्रार कुणापाशी

मार मला बसायचा आणि रडायची तू
मी किती ओवाळनी टाकणार हे माहित
असून सुद्धा प्रेमाने राखी बांधणारी तू
आणि भिरभीरणारी तूझी
नजर खुप काही सांगुन गेली ताई

**– राहुल राजेंद्र तांदुळे**
बी.एड. द्वितीय वर्ष

## तयारी ठेवा...

यश प्राप्तीसाठी तुम्ही
कष्टाचीही तयारी ठेवा
आकाश गाठणे आहे
गरूड झेपेची तयारी ठेवा
मन भटकेल इकडे-तिकडे
ताबा ठेवण्याची तयारी ठेवा

लक्ष अजून खूप दूर आहे
स्वप्नात खूप सूट आहे
चांगलं आयुष्य मिळवण्यासाठी
वाईट विचार सोडण्याची तयारी ठेवा
अनेक अडचणी येतील वाटेत
मात करण्याची ही तयारी ठेवा

अनेकदा तुझेच तुला हे
सर्व सोड म्हणतील
तेव्हा संयम बाळगण्याची तयारी ठेवा
अनेकदा अपयश हाती येईल
आणखी एका प्रयत्नाची तयारी ठेवा

जेव्हा तु हे सर्व सोसशील
एक दिवस नक्की चमकशील
तुझा संघर्ष हा प्रेरणा असेल
तुला बघून आणखी घडतील
तुझे सर्वच स्वप्न होतील
फक्त ते जिद्दीने करण्याची तयारी ठेवा.

**- राहुल राजेंद्र तांदुळे**
बी.एड. द्वितीय वर्ष



महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा

अध्यापक व छात्र अध्यापक

# विदर्भ युवक विकास संस्था, बुलडाणा



## विदर्भ युवक विकास संस्थेचे उपक्रम

- मुकूल वासनिक विधी महाविद्यालय, बुलडाणा
- महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा

### यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

केंद्र क्र. १३१५७

- बी.ए.
- बी.कॉम.
- एम.ए. (इंग्रजी)
- एम.ए. (मराठी)
- एम.ए. (हिंदी)
- एम.ए. (शिक्षणशास्त्र)
- डी.एस.एम.
- एम.सी.जे.